# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक : - १७ एप्रिल २०२५

---

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) : - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील युनिर्व्हसिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथील ६ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखती अंतर्गत निवड झाली आहे.

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाद्वारे गद्रे मरीने एक्सपोर्ट प्रा.लि. रत्नागीरी व सचादे फुड प्रा.लि. अहमदाबाद ह्या कंपनीतर्फे बी.टेक. (फुड टेक्नॉलाजी) च्या विद्यार्थ्यांची परिसर मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामधुन गद्रे मरीने एक्सपोर्ट प्रा.लि. रत्नागीरी ह्या कपंनीमध्ये यात अनुक्रमे ५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये आदीत्य वानखेडे, रुतीका मराठे, मधुरा काळे, धिरज देशमुख, राधा माळी या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तसेच सचादे फुड प्रा.लि. अहमदाबाद या कंपनीत हर्षल पवार या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या निवड झालेल्या विद्यार्थ्याचे कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी,प्र-कुलगुरु एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, युनिर्व्हसिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा.अजयगिरी गोस्वामी यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.या परिसर मुलाखतीसाठी युनिर्व्हसिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे विभाग प्रमुख प्रा.विशाल पराते, डॉ. भुषण चौधरी, डॉ. प्रशांत मांडे तसेच युनिर्व्हसिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (केमीकल इंजिनिअरींग) विभागाचे प्रमुख व केंद्रीय प्रशिक्षण नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार,उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर श्रीमती सोनाली दायमा यांनी व्यवस्थापन केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) : - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात डॉ.दीपक खरात यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी डॉ.दीपक खरात यांनी, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर लिखित शुद्र पुर्वी कोण होते व भाई किशनराव देशमुख लिखित मनुस्मृती यांचे संदर्भ देवून व्याख्यान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपा प्रसंगी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म.सु.पगारे यांनी चित्तातील मळभ दुर करायचे असल्यास बुध्दीवादाने सत्ताला भिडणारे विचार करणे व ते अमलात आणणे अत्यंत महत्त्वाचे असते असे प्रतिपादन केले. डॉ. सुदर्शन भवरे,कृष्णा संदानशिव, भरती सोनवणे, प्रतिभा गलवाडे, डॉ. प्रिती सोनी, खेमराज पाटील यांनी प्रश्न विचारले. या प्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रतिभा गलवाडे यांनी केले.

---

प्रति, मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.विनोद पाटील

कुलसचिव